MHSN120004762025

दाखल दिनांक – १२.०६.२०२५

नोंदणी दिनांक – १२.०६.२०२५

निकाल दिनांक – २३.०६.२०२६

कालावधी – ०१ वर्ष, ०० महिने, ११ दिवस.

पलूस येथील न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग यांचे न्यायालयात

(पिठासीन अधिकारी – एम.ए.एम.जे. शेख)

नियमीत फौजदारी खटला क्र.५९/२०२५

नि.क्र.

**अभियोग पक्ष** **महाराष्ट्र सरकार** तर्फे – पोलीस निरीक्षक,
**पलूस पोलीस ठाणे.**

**अभियोग पक्षातर्फे** श्री.आर.आर. चांगण, सहा. सरकारी अभियोक्ता.

विरूध्द

**आरोपी** **सोमनाथ तुकाराम पुर्के**
वय – ३३ वर्षे, धंदा – --
रा.तुरची, ता.तासगांव, जि.सांगली.

**आरोपीतर्फे वकील** श्री.पी.एस. देशमुख.

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडलेचा दिनांक | | ०२.०४.२०२५ |
| गुन्हा रजिस्टर क्रमांक | | ५८/२०२५ |
| दोषारोपपत्र दाखल दिनांक | | १२.०६.२०२५ |
| दोषारोपपत्र न्यायालयात दाखल दिनांक | | १२.०६.२०२५ |
| साक्षीपुरावा सुरु झालेचा दिनांक | | १२.०६.२०२५ |

| | | |
|---|---|---|
| युक्तिवाद दिनांक | | २३.०६.२०२६ |
| न्यायनिर्णय दिनांक | | २३.०६.२०२६ |
| दोषसिध्दी व शिक्षेबाबत आदेश | | निर्दोष मुक्तता. |

## आरोपीची माहिती

| अनु-क्रमांक | आरोपीचे नांव | आरोपीस अटक दिनांक | आरोपीस जामिनावर खुले केलेचा दिनांक | दोषारोपा-तील कलम | आरोपीस दोषमुक्त किंवा दोषसिध्द केले | आरोपीस झालेली शिक्षा | भा.ना.सु. सं.क. ४६८ नुसार आरोपीने संपरिक्षे दरम्यान भोगलेली शिक्षा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | सोमनाथ तुकाराम पुर्के | दि.०२.०४.२०२५रोजी भा.ना.सु.सं. चे कलम ३५(३) प्रमाणे नोटीस | १२.०६.२०२५ | भा.न्या.सं.क. ३०३(२) सह कलम ४, २५ खाण खनिज अधिनियम प्रमाणे | निर्दोष मुक्तता | --- | --- |

## <u>अभियोग पक्षातर्फे घेतलेल्या साक्षीदाराची यादी</u>

| अ.क्र. | साक्षीदाराचे नांव | निशाणी क्र. | साक्षीदाराचे स्वरुप |
|---|---|---|---|
| १ | पांडुरंग शिवाजी शिंदे | ११ | पंच |
| २. | सुधाकर शिवाजी पाटील | १४ | फिर्यादी |
| ३. | दिलीप दत्तु गोरे | १७ | तपासी अंमलदार |

## <u>अभियोग पक्षातर्फे सिध्द केलेले दस्तऐवज</u>

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| १. | नि.१५ व १६ | फिर्याद व प्रथम खबर अहवाल |

| | | |
|---|---|---|
| २. | नि.१८ | घटनास्थळ तथा जप्ती पंचनामा |
| ३. | नि.२० | मुद्देमाल पावती |

## – न्यायनिर्णय –

## (घोषणा तारीख– २३.०६.२०२६)

प्रस्तूतचा खटला आरोपीविरुध्द भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) सह कलम ४, २५ खाण व खनिज अधिनियम प्रमाणे या अपराधांसाठी चालविण्यात आला.

२. **अभियोग पक्षाची थोडक्यात हकिकत अशी की,** दि.०२.०४.२०२५ रोजी फिर्यादी सुधाकर शिवाजी पाटील, पो.शि.ब.नं.११९६ पोलीस ठाणे पलूस यांनी फिर्याद देवून असे कथन केले की, त्यादिवशी कर्तव्यावर हजर असताना ते स्वतः, सहा.पो.नि.सुशांत पाटील, पो.हे.काँ.गोरे, पो.हे.कॉ.भिंगारदेवे असे सर्व सकाळी ७–४५ वाजताच्या सुमारास खाजगी वाहनाने अवेघ धंद्यांवर कारवाई करण्याकरिता गेले होते. त्यावेळेस पेट्रोलिंग करीत असताना सकाळी ८–१५ वाजताच्या सुमारास जुना सातारा रोडने बांबवडे ते सांडगेवाडी रोडने पेट्रोलिंग करीत असताना एक पांढ–या रंगाचे महिंद्रा कंपनीची बुलेरो पिकअप गाडी विना नंबर प्लेटची दिसून आली. त्यांनी त्यास हॉटेल महालक्ष्मीजवळ रोडच्या बाजुला थांबविले व त्याची पाहणी केली असता त्यामध्ये वाळु भरलेली दिसली. त्यांनी वाळु वाहतुक परवानाबाबत विचारणा केली असता त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली. सदर वाहन चालकास त्याचे नांव विचारले असता त्याने त्याचे नांव सोमनाथ तुकाराम पुर्के, रा.तुरची असे सांगितले. तसेच, त्यास वाहन कागदपत्रांबाबत विचारणा केली असता त्याने कागदपत्र नसल्याचे सांगितले. त्यानंतर पो.हे.कॉ.गोरे यांनी दोन पंचांना बोलावून सदरची गाडी व गाडीमध्ये असलेली अंदाजे एक ब्रास वाळु किमत रु.६०००/– जप्त केली त्यानंतर त्यांनी प्रस्तुतची फिर्याद दाखल केली.

३. सदरची फिर्याद गुन्हा रजिस्टर नंबर ५८/२०२५ ने नोंदविली व सदर गुन्ह्याचा तपास तपासी अधिकारी यांनी करुन तपास पूर्ण झाल्यानंतर न्यायालयात आरोपीविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

४. आरोपीवर भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) सह कलम ४, २५ खाण व खनिज अधिनियम अन्वये दोषारोप (निशाणी क्र.९) ठेवले. सदरचे दोषारोप तो त्यांना वाचून दाखवला असता त्यांनी त्यांचेवरील सर्व आरोप नाकारले व सुनावणीस सामोरे जाण्याची तयारी दर्शवली आहे. आरोपीचे भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम ३५१ प्रमाणे निवेदन नोंदवण्यात आले असता त्याने नकारार्थी उत्तरांचा आधार घेत त्याच्याविरुध्द असणारा सर्व खटला नाकारला.

५. सन्माननीय सरकारी अभियोक्ता व आरोपीतर्फे सन्माननीय वकीलांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे बारकाईने अवलोकन केले.

६. अभिलेख, पुरावे व उभयबाजूंचा युक्तीवाद पाहता, सदर प्रकरणात निकालासाठी खालील मुद्दे निघतात, ते मुद्दे व त्यांचे निष्कर्ष कारणांसहित खालीलप्रमाणे आहेत.

| अ.नं. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दि.०२.०४.२०२५ रोजी सकाळी ८-१५ वाजताच्या सुमारास हॉटेल महालक्ष्मी जवळ, जुना सातारा रोडवर, सांडगेवाडी, पलूस ता.पलूस, जि.सांगली येथे आरोपी पांढ-या रंगाच्या महिंद्रा बोलेरो विना नंबर प्लेटच्या गाडीमध्ये अंदाजे एक ब्रास वाळू चोरुन नेले व त्याअन्वये भा.न्या.सं.चे कलम ३०३(२) प्रमाणे गुन्हा केला, हे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय ? | ... **नकारार्थी** |
| २. | उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने विनापरवाना वाळुची वाहतुक केली व महसुल अधिकारी यांना परवाने | ... **नकारार्थी** |

तपासणीपासून रोखले व त्याअन्वये खाण व खनिज अधिनियम कलम ४, २५ प्रमाणे गुन्हा केला, हे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय ?

३. काय आदेश ? **अंतिम आदेशाप्रमाणे.**

## –कारणमिमांसा–

**मुद्दा क्र.१ व २ करिता –**

**७.** आरोपीवरील गुन्हा शाबीत करण्याच्या दृष्टीने अभियोग पक्षास आरोपीने विनापरवाना वाळुची वाहतुक केली व परवाना तपासणेपासून अधिकारी यांना रोखले या बाबी सिध्द करणे आवश्यक होते. सदरच्या बाबी सिध्द करणेकरिता अभियोग पक्षाने साक्षीदार क्र.२ फिर्यादी सुधाकर पाटील यांची साक्ष पटलावर नोंदविली आहे. सदर साक्षीदाराने त्यांच्या साक्षीमध्ये दि.०२.०४.२०२५ रोजी सहा.पो.नि.सुशांत पाटील, त्यांचे सहकारी गोरे व भिंगारदेवे असे सर्व खाजगी वाहनाने पेट्रोलिंग करीत असताना बांबवडे ते सांडगेवाडी रोडवर एक पिक अप बोलेरो महिंद्रा कंपनीचे वाहन दिसले त्यामुळे त्यांनी त्याला थांबवून तपासणी केली असता त्यांना वाळु भरलेली दिसून आली व सदर चालकास त्याचे नांव विचारले असता त्याने त्याचे नांव सोमनाथ तुकाराम पुर्के असे सांगितले व वाळुच्या परवानाबाबत विचारणा केली असता त्याने परवाना नसल्याचे सांगितले व त्यानंतर गोरे यांनी पंचांना बोलावून जप्ती पंचनामा केला व त्यानंतर त्यांनी नि.क्र.१५ व १६ प्रमाणे फिर्याद दाखल केली. सदर साक्षीदाराने त्याच्या उलटपासात फिर्याद दाखल करण्यापुर्वी सक्षम अधिकारी यांची पुर्वपरवानगी अथवा लेखी अधिकारपत्र घेतले नसल्याचे तसेच, तथाकथित वाळु संदर्भात तहसिलदार अथवा इतर अधिकारी यांना माहिती दिली नसल्याचे तसेच, त्याने स्वतः आरोपींच्या ओळखपत्रांची तपासणी केली नसल्याचे मान्य केले आहे.

८. अभियोग पक्षाने घटनास्थळ पंचनामा सिध्द करण्याकरिता साक्षीदार क्र.१ पांडुरंग शिंदे यांची साक्ष पटलावर नोंदविली आहे. त्याने त्याच्या साक्षीत पोलीसांनी दि.०२.०४.२०२५ रोजी पंचनामा करण्याकरिता बोलावले नसल्याचे व पंचनामाबाबत काहीही माहित नसल्याचे कथन केले आहे. परंतु त्याने पंचनामाबाबत नि.क्र.१२ प्रमाणे सही असल्याचे मान्य केले आहे. अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी वकीलांनी सदर साक्षीदारास भारतीय साक्ष अधिनियमचे कलम १५७ अन्वये उत्तरसुचक स्वरुपात प्रश्न विचारले परंतु, घटनास्थळ पंचनामा सिध्द होईल असा कोणताही पुरावा पटलावर आला नाही. जरी साक्षीदार क्र.१ याने घटनास्थळ पंचनामाबाबत काहीही कथन केले नसले तरीही साक्षीदार क्र.३ तपासीक अंमलदार या नात्याने साक्ष दिली असून त्याने त्याच्या साक्षीत दि.०२.०४.२०२५ रोजी पंचांसमक्ष घटनास्थळ तथा जप्ती पंचनामा नि.क्र.१८ प्रमाणे केला असल्याचे कथन केले आहे. सदर साक्षीदाराने त्याच्या उलटतपासात तथाकथित वाहनाच्या कागदपत्राची मागणी आरोपीकडे केली नसल्याचे तसेच, तथाकथित वाळु जप्त केल्याबाबत तहसिलदार यांना पत्र दिले नसल्याचे मान्य केले आहे. अभियोग पक्षाने साक्षीदार क्र.३ याच्या साक्षीदरम्यान घटनास्थळ तथा जप्ती पंचनामा सिध्द केला आहे. जरी अभियोग पक्षाने नि.क्र.१८ प्रमाणे पंचनामा सिध्द केला असला तरीही आरोपीने गुन्हा केल्याची बाब निष्पन्न झाल्याचे ग्राह्य धरता येणार नाही. अभियोग पक्षास सदरच्या बाबी पुराव्यानिशी सिध्द करणे आवश्यक आहे. साक्षीदार क्र.२ याने जरी फिर्याद व प्रथम खबर अहवाल नि.क्र.१५ व १६ सिध्द केला असला तरीही सदर साक्षीदाराच्या साक्षीस दुजोरा प्राप्त होईल असा कोणताही साक्षीदार अभियोग पक्षाने संधी असतानादेखील तपासला नाही. तसेच, तथाकथित जप्त केलेला मुद्देमाल हा वाळु होता हे सिध्द करण्याकरितादेखील अभियोग पक्षाने पटलावर कोणताही रासायनिक अहवाल पटलावर सादर केला नाही तसेच, इतर महत्वाचे साक्षीदार देखील तपासले नाही. तसेच अभियोग पक्षाच्या साक्षीदरम्यान आरोपीने कशाप्रकारे परवाने तपासण्यास अडथळा केला याबाबत कोणताही उपापोह करण्यात आला नाही. त्यामुळे

पटलावर आलेल्या पुराव्याचा विचार करता अभियोग पक्षाने आरोपीने वाळुची चोरी करुन वाहतुक करताना मिळून आला व त्याने अधिकारी यांना परवाने तपासणीपासून प्रतिबंध केला याबाबी संशयापलीकडे अभियोग पक्षाने सिध्द केले नाही त्यामुळे त्याचा फायदा निश्चितच आरोपीस होत आहे. करिता, मी मुद्दा क्र.१ व २ चे निष्कर्ष नकारार्थी नोदवित आहे.

**<u>मुद्दा क्र.३ करिता–</u>**

९. प्रस्तुत प्रकरणातील जप्त मुद्देमाल एक पांढ–या रंगाची विना नंबर प्लेटची महिंद्रा बोलेरो कंपनीची पिकअप गाडी याची भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम ४९८ अन्वये अपिल कालावधी संपल्यानंतर त्याच्या मुळ कागदपत्रांची पडताळणी करुन मुळ मालकास परत देणेबाबत तसेच जप्त एक ब्रास वाळु हे भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम ४९८ अन्वये अपिल कालावधी संपल्यानंतर तहसिलदार, पलूस यांचेकडे अपिल कालावधी संपल्यानंतर योग्य त्या कार्यवाहीकरिता पाठविणेबाबत आदेश करणे योग्य व न्यायोचित ठरेल.

१०. वरील सर्व चर्चेचे व खटल्यातील संपुर्ण अभिलेखाचे अवलोकन केल्यानंतर आरोपींची प्रस्तुत गुन्ह्यातून निर्दोष मुक्तता करणे न्यायोचित होईल. करीता मुद्दा क्र.३ चे उत्तरार्थ मी पुढील आदेश करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. **आरोपी सोमनाथ तुकाराम पुर्के** याची भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ कलम २७१ नुसार भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) सह कलम ४, २५ खाण व खनिज अधिनियमच्या गुन्ह्यांमधून निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

**२.** आरोपीचे जामीन व बंधपत्र रद्द करणेत येतात.

**३.** जप्त मुद्देमाल एक पांढ–या रंगाची विना नंबर प्लेटची महिंद्रा बोलेरो कंपनीची पिकअप गाडी याची भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम ४९८ अन्वये अपिल कालावधी संपल्यानंतर त्याच्या मुळ कागदपत्रांची पडताळणी करुन मुळ मालकास परत देणेत यावे तसेच जप्त एक ब्रास वाळु हे भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम ४९८ अन्वये अपिल कालावधी संपल्यानंतर तहसिलदार, पलूस यांचेकडे अपिल कालावधी संपल्यानंतर योग्य त्या कार्यवाहीकरिता पाठविण्यात यावे.

**४.** आरोपीने भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ कलम ४८१ अंतर्गत वैयक्तिक जातमुचलका व बंधपत्र र.रु.१५,०००/– चे न्यायालयात सादर करावे.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत केला)**

SHAIKH MOHAMMED AAMER

Digitally signed by SHAIKH MOHAMMED AAMER
Date: 2026.06.23 17:39:22 +0530

**ठिकाण– पलूस.** **(एम.ए.एम.जे. शेख)**

**दिनांक – २३.०६.२०२६** **प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, पलुस.**

C E R T I F I C A T E

I affirm that, the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original Order/Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | Sou.G.A. Patil (Grade-3) |
| Court | : | M.A.M.J. Shaikh, Civil Judge Junior Division & Judicial Magistrate First Class, Palus, Dist. Sangli. |
| Date | : | 23.06.2026 |
| Order/Judgment signed by the Presiding officer on | : | 23.06.2026 |
| Order/Judgment uploaded on | : | 23.06.2026 |